**<u>सं.फौ.ख.क्रं.८९३/२०२१</u>** शासन वि. नाना लोखंडे

**<u>नि.क्रं. ३०</u>**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं.७ ची साक्ष शपथेवर सुरु**

| | | |
|---|---|---|
| नाव | – | सलिम नुर शेख |
| वय | – | ५५ वर्षे, |
| व्यवसाय | – | सहाय्यक फौजदार |
| सध्या कार्यरत | – | जामखेड पोलीस स्टेशन, जि. अहिल्यानगर, |
| राहणार | – | जामखेड, ता. जामखेड, जि. अहमदनगर |

**<u>सरकारतर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एन. आर. वाघ यांच्यामार्फत सुरुः–</u>**

दि. ०४/०३/२०२१ रोजी मी कर्जत पोलीस स्टेशन येथे पो.हे.कॉ. म्हणुन कार्यरत होतो. त्यावेळी मी कर्तव्यावर असताना अकस्मात मृत्यु रजि.नं.१६/२०२१ चा तपास माझ्याकडे ठाणे अंमलदार यांच्या लेखी आदेशाने आला. आता मला तो आदेश दाखवला. मला नि.क्र.१९ ची प्रथम खबरी अहवाल देण्यात आला होता. उपजिल्हा रुग्णालय, कर्जत येथे मयताचा नि.क्र.२५ प्रमाणे मरोणोत्तर पंचनामा झाला. डॉक्टरांनी पोस्टमार्टम केल्यानंतर मयताचे प्रेत नातेवाईकाकडे देण्यात आले. दुसऱ्या दिवशी मयताच्या नातेवाईकांनी कर्जत पोलीस स्टेशन येथे घटनेची फिर्याद दिली. त्यावरुन गु.र.नं. १२०/२१ दाखल झाला. त्यानंतर लेखी आदेशान्वये गुन्ह्याचा तपास माझ्याकडे देण्यात आला. आता मला तो लेखी आदेश दाखवला. त्यावर पो.ना.श्री. यमगर यांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.३१</u>** देण्यात येते. तसेच अभिलेखावर एफ.आय.आर.ची प्रत आहे. त्यावर पो.ना. श्री. यमगर यांची सही आहे. ती मी ओळखतो. एफ.आय.आर.प्रत **<u>नि.क्र.३२</u>** वर आहे. त्यासोबत मला दैनिक अहवाल देखील दिला होता. तसेच मला नि.क्र.२० वरील फिर्यादी जबाब दिला होता. मी नि.क्र.१४ प्रमाणे घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यानंतर पुरवणी जबाब नोंदवले. मयताच्या पी.एम. नोट्स हस्तगत करुन दोषारोपासोबत दाखल केले. आर.टी.ओ. यांना वाहनाची तपासणी करणेबाबत पत्र पाठवले. आता मला ते पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. ते पत्र **<u>नि.क्र.३३</u>** वर आहे. आर.टी.ओ.साहेबांचा तांत्रिक वाहन तपासणीचा अहवाल प्राप्त झाला व तो अभिलेखावर दाखल आहे. त्यानंतर आरोपीविरुध्द मी न्यायालयात दोषारोप दाखल केले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फत उलटतपास सुरु.</u>**

२.  दयानंद अमृत खराडे याचा जबाब मी या गुन्ह्यात नोंदवलेला नाही. दयानंद खराडे याला मी पोलीस स्टेशनला बोलवलेले नाही. घटनास्थळी मी दयानंद अमृत खराडे याचा जबाब नोंदवलेला नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, मी त्याची पंच म्हणुन सही घेतली आहे. घटनास्थळी दयानंद खराडे याने 'मी घटना पाहिली' असे सांगितलेले नव्हते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सदर व्यक्तीला मी पंच म्हणुन बोलवलेले होते. दयानंद अमृत खराडे यांनी माझ्यासमोर घटना घडली असे मला सांगितलेले नाही. हे खरे आहे की, दयानंद खराडे याने आजिनाथ बाबुराव तेथे आले, भगवान मंडलिकला नाना विठ्ठल लोखंडे याने धडक दिली असे मला सांगितलेले नाही. फिर्याद दाखल होण्यापुर्वी मी व्यक्तीशः घटनेची चौकशी केली. अपघात झाल्याबद्दल चौकशी केली होती. अकस्मात मृत्युची नोंद झाल्यानंतर फिर्यादीवरुन गुन्हा दाखल होईपर्यंत मी कोणाचेही जबाब नोंदवलेले नाहीत, परंतु चौकशी केली होती. हे खरे आहे की, गुन्हा दाखल झाल्यानंतर मी फिर्यादीप्रमाणे तपास केला. हे खरे आहे की, फिर्यादीप्रमाणे मी साक्षीदाराचे जबाब घेतले. हे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन तपास करुन दोषारोप दाखल केले. हे खरे आहे की, फिर्याद दाखल होण्यापुर्वी केलेल्या चौकशीत व फिर्यादीमध्ये ट्रॅक्टरचा क्रमांक नमुद नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, आरोपीचे नाव फिर्यादीमध्ये होते. हे खरे नाही की, केवळ फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी आरोपीचे नाव सांगत आहे. हे खरे नाहे की, अकस्मात मृत्युचा तपास माझ्याकडे आला, मी जबाब घेतले, मी पंचनामा केला हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी खोटे जबाब व पुरवणी जबाब घेतले. हे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी खोटा तपास करुन, खोटे दोषारोपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.03.13 17:01:35 +0530

(आर. बी. राऊत)

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कर्जत.

(न्यायालय क्र. २)

दिनांकः १३/०३/२०२६.